शांततापूर्ण निषेध

नेल्सन मंडेला यांचे जीवनचरित्र



नेल्सन मंडेला हे आधुनिक जगातील सर्वाधिक स्फूर्तिदायक व्यक्तिमत्त्वांमध्ये गणले जातात. त्यांनी सदोदीत आपल्या अंतरात्म्याचा आवाज ऐकला आणि दक्षिण आफ्रिकेतील आपल्या लोकांच्या नागरी हक्कांसाठी संघर्ष केला. वर्णभेदाविरुद्ध लढणाऱ्या या महान नेत्यास 1963 ते 1990 या काळात अन्याय्य पद्धतीने कैदेत डांबण्यात आले. त्यांनी आपल्या देशाच्या सामाजिक समस्यांवर शांततापूर्ण पद्धतीने तोडगा काढण्याचे प्रयत्न केले. यासाठी त्यांना नोबेल शांतता पुरस्कार मिळाला. आपल्या कृष्णवर्णीय बांधवांना समान हक्क मिळावा म्हणून, त्यांनी अहिंसक मार्गाने लढा दिला. त्यामुळे संपूर्ण जग त्यांच्या बाजूने उभे राहिले. सद्भावना आणि आंतरराष्ट्रीय समर्थन या जोरावर दडपशाही शासन उलटता येते, हे मंडेलांनी सिद्ध करून दाखवले. मग दक्षिण आफ्रिकेच्या प्रजासत्ताक सरकारचे पहिले कृष्णवर्णीय अध्यक्ष बनून त्यांनी उरले-सुरले सारे अडथळे दूर केले.

या पुस्तकात *योना झेल्दिस मॅक्डोनॉ* आणि *मॅल्का झेल्दिस* यांनी नेल्सन मंडेला यांच्या बालपणापासून त्यांना झालेली कैद आणि त्यानंतरचा काळ असे त्यांच्या संपूर्ण आयुष्याचे चित्रण केले आहे. यातून मंडेला यांचा *स्वातंत्र्यासाठी चाललेला दीर्घ प्रवास* नव्या पिढीस परिचित होईल. लहानथोर सर्वच लोकांना हा प्रवास वाचायला आवडेल.

माझा मुलगा, *जेम्स रेडन मॅक्डोनॉ*, यास समर्पित....

- *योना झेल्दिस मॅक्डोनॉ*



शांततापूर्ण निषेध

नेल्सन मंडेला यांचे जीवनचरित्र

योना झेल्दिस मॅक्डोनॉ

चित्रे: मॅल्का झेल्दिस





*बूटी मंडेला*चा जन्म 18 जुलै 1918 रोजी दक्षिण आफ्रिकेतील *म्वेजो* या छोट्याशा गावात झाला. त्याचे वडील, *थेंबू* या कृष्णवर्णीय जमातीचे सरदार, *गादरा हेन्री म्फाकेनिस्वा* हे थेंबू जमातीचे एक समंजस आणि आदरणीय शासक होते.

थेंबू प्रजातीचे पूर्वज अनेक वर्षांपासून आफ्रिकेत राहात होते. म्हणजे, खरंतर आफ्रिका ही थेंबूंची मातृभूमी होती. तरी त्यांना गोऱ्या शासकांच्या अंमलाखाली जगावे लागत होते. हे गोरे, मुख्यत: इंग्रज आणि डच, यांनी 1700 साली थेंबूंच्या प्रदेशावर कब्जा केला आणि थेंबू प्रजातीवर आपला वचक प्रस्थापित केला.

एकदा एका इंग्रज न्यायाधिशाने एका बैलाबाबत आलेल्या तक्रारीवरून थेंबूंचा सरदार हेन्रीला कोर्टात हजर राहाण्याचा आदेश बजावला. थेंबूंचा सरदार म्हणून आपण फक्त थेंबूंच्या राजाचा आदेश पाळायचा, कुणा इंग्रज अधिकाऱ्याचा नाही, असे हेन्रीचे मत होते. त्यामुळे त्याने कोर्टात हजर होण्यास नकार दिला. या अवज्ञेमुळे हेन्रीचे सरदारपद काढून घेण्यात आले. आपल्या तत्वांसाठी हेन्रीने आपली जमीन, गुरे-ढोरे आणि सरदारपद हे सारे गमावले.

या काळात बूटी वयाने खूप लहान होता. पण आपले वडील एक तत्वनिष्ठ व्यक्ती आहेत आणि कितीही किंमत चुकवावी लागली तरी ते आपल्या मतांवर ठाम राहातात, हे मोठे होताना बूटीला हळूहळू कळत गेले.




या घटनेनंतर हेन्री कुटुंबकबिला घेऊन शेजारच्या *कुनु* गावात राहाण्यास गेला. तिथे ते नातलगांच्या शेतावर राहू लागले. ही जागा खूप छोटी असली तरी बूटीला आवडली. त्यांचे घर म्हणजे तीन छोट्या झोपड्या होत्या. झोपड्यांच्या भिंती मातीच्या विटांनी बनल्या होत्या आणि छत गवताच्या चाऱ्याने शाकारले होते. यांतील एक झोपडी होती स्वयंपाकासाठी, एक होती निजण्यासाठी आणि एक होती अन्नधान्याचा साठा करण्यासाठी. घरातील खुर्च्याही मातीच्याच बनल्या होत्या. चूल म्हणून जमिनीत एक खड्डा होता.

दिवसा बूटी गुरेढोरे राखायचे काम करत असे आणि आपल्या मित्रांसोबत आणि सावत्र भावंडांसोबत खेळत असे. त्या काळातील प्रथेनुसार, त्याच्या वडिलांना चार पत्नी आणि तेरा मुले होती. मुले मातीचे प्राणी आणि पक्षी अशी खेळणी स्वतःच बनवत असत. ते लपालपी, पकडापकडी आणि लुटुपुटीची लढाई असे खेळही खेळत असत.

रात्री बूटी चटईवर अंग टाकत असे. झोपण्यापूर्वी त्याचे आईवडील त्याला गोष्टी सांगत. त्याचे वडील नेहमी युद्धाच्या शौर्यकथा सांगत असत तर आई थेंबू प्रजातींमध्ये पूर्वापार सांगितल्या जाणाऱ्या नीतीकथा आणि दंतकथा सांगत असे.







बूटी सात वर्षांचा झाला तेव्हा त्याच्या आईवडिलांनी त्याला शाळेत पाठवायचे ठरवले. हेन्री मंडेला हे स्वतः कधी शाळेत गेले नव्हते. पण या मुलाला शाळेत जाण्याची संधी द्यायला हवी, असे त्यांना वाटले. बूटीचे तीन सावत्र भाऊ वयाने मोठे झाल्यावर घर सोडून निघून गेले होते. त्यामुळे बूटी हेच मंडेला कुटुंबातील शाळेत जाणारे पहिले मूल ठरले.

शाळेच्या पहिल्या दिवशी, शिक्षकांनी विद्यार्थ्यांची नावे बदलून सर्वांना इंग्रजी नावे दिली. घरी परतल्यावर बूटीने आपल्याला *नेल्सन* म्हणावे, असे घरातील सर्वांना सांगितले. बूटीच्या शिक्षकांनी त्याचे हे नवे नामकरण केले होते. बूटीची शाळा ब्रिटिश लोक चालवत होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा, इंग्रजांचा इतिहास, त्यांचे रिती-रिवाज आणि संस्कृती सर्वश्रेष्ठ असल्याचे शिकवले जाई. विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या समाजातील परंपरा आणि रुढी यांचा आदर करायला शिकवत नसत.

पण तरीही नेल्सनला शाळा आवडली. तिथे रोज नवनवीन गोष्टी शिकायला मिळत. त्याला शाळेत शिकवलेले लिहून काढायला एक पाटी-पेन्सिलही दिली होती.

1927 साली वयाच्या नवव्या वर्षी, नेल्सनच्या वडिलांचे निधन झाले. आयुष्यभर त्यांनी आपली ठाम मते आणि मूल्ये यांवर अढळ श्रद्धा ठेवली. आपल्या तत्वनिष्ठ वडिलांच्या मृत्यूचे नेल्सनला खूप दुःख झाले.





नेल्सनला दर्जेदार शिक्षण मिळावे आणि एक आदर्श व्यक्ती बनून आपल्या समाजासाठी त्याने एक उदाहरण ठरावे, अशी हेन्रीची तीव्र इच्छा होती. त्यामुळे नेल्सन आणि त्याच्या आईने कुनु गाव आणि त्याची छोटीशी शाळा सोडली. ते पायीपायीच थेंबूलँडची राजधानी *म्क्वेकेझविनी* शहरात गेले. त्यावेळी नेल्सनकडे फक्त एक टीनची पेटी होती. त्याने अंगावर जुना सदरा घातला होता. त्याच्या वडिलांची जुनी पँट कापून बनवलेली चड्डी त्याने घातली होती. ही चड्डी त्याने एका रश्शीने कमरेवर घट्ट बांधली होती. त्या शहरात राहाणारे आफ्रिकी लोक म्क्वेकेझविनी शहराला *महान स्थान* म्हणत. तेथील मोटारगाड्या, मोठमोठी घरे, सुंदर बगीचे आणि फळांनी लगडलेल्या बागा पाहून नेल्सन विलक्षण आश्चर्यचकीत झाला.

नेल्सन आपल्या वडिलांचे एक नातेवाईक, सरदार *जोगिंताबा डॅलिनडायबो,* यांच्या घरी राहू लागला. त्यांनी नेल्सनच्या पालकत्वाची जबाबदारी घेतली. लवकरच, एका छोट्याशा गावातील नेल्सनने मोठ्या शहरातील नव्या आयुष्याशी जुळवून घेतले. सरदार जोगिंताबाची मुले आणि नेल्सन एकत्रच शाळेत आणि चर्चमध्ये जाऊ लागले. त्यांच्यात घनिष्ठ मैत्री झाली. नेल्सनने शाळेत चांगली प्रगती केली. पण ही प्रगती आपण हुशार होतो म्हणून नव्हे, तर आपल्याला यशस्वी होण्याची तीव्र इच्छा होती म्हणून झाली, असे नेल्सन म्हणत असे.

नेल्सनला मोठ्या शहरात राहायला आवडू लागले. इथे बरेच लोक सरदार जोगिंताबाकडे सल्ले मागायला येत. नेल्सन त्यांच्या गप्पा लक्षपूर्वक ऐकत असे. या लोकांकडूनच नेल्सनला आफ्रिकेच्या इतिहासाचे आणि महान व्यक्तिमत्वांचे ज्ञान मिळाले. त्यांच्याकडून ऐकलेल्या कथा-गोष्टी दीर्घकाळ त्याच्या मनात रेंगाळत राहिल्या.



वयाच्या सोळाव्या वर्षी पुरुष अवस्थेत प्रवेश करताना नेल्सनला काही पारंपारिक विधींमध्ये सहभागी व्हावे लागले. विधीनुसार, जमातीतील मुलांना *मबाशा* नदीच्या काठावरून प्रवास करावा लागे. यावेळी गावातील जेष्ठ लोक त्यांना मार्गदर्शन करत. ही मुले आपल्या सर्वांगावर पांढरी माती फासून आणि कमरेभोवती गवताचा घागरा घालून नाचत-गात आणि गोष्टी ऐकवत. यांतीलच एका वक्त्याने नेल्सनला प्रभावित केले. तो म्हणाला की त्यांची पुरुष होण्याची स्वप्ने अर्धवटच राहाणार. कारण सर्व कृष्णवर्णीय दक्षिण आफ्रिकी लोक हे स्वतःच्याच भूमीत पराभूत आणि गुलाम आहेत. त्यांनी त्यांचे स्वातंत्र्य आणि हक्क गमावले आहेत.

बऱ्याच वर्षांनंतर नेल्सनने लिहून ठेवले की त्या कोवळ्या तरूण वयात हे शब्द त्याच्या मनात रुतून बसले. त्यावेळी तो याबाबत काही करू शकत नव्हता. पण या विचारांनी त्याच्या मनात घर केले, त्याला एक नवी दृष्टी दिली. याच दृष्टिकोनातूनपुढे तो जगाकडे आणि स्वतःकडे पाहू लागला.








नेल्सनने आपले शिक्षण सुरू ठेवले. सुरुवातीला तो एन्गकोबो जिल्ह्यातील *क्लार्कबरी बोर्डिंग इन्स्टिट्यूट* या थेंबू कॉलेजमध्ये शिकला. त्यानंतर तो ॲलिस महानगरपालिकेतील *फोर्ट हेर* या कॉलेजमध्ये शिकला. हे कॉलेज ब्रिटिश मिशनरींकडून संपूर्ण आफ्रिकेतील कृष्णवर्णीय विद्यार्थ्यांसाठी चालवले जात होते. याच काळात नेल्सनने अंगवळणी पडलेल्या आपल्या काही देशी सवयी बदलायला सुरुवात केली. तो दात स्वच्छ करण्यासाठी राखेऐवजी टुथपेस्ट आणि ब्रश वापरू लागला. पँट, शौचालयातील फ्लश आणि आंघोळीसाठी गरम पाण्याचे फवारे या गोष्टी वापरायला तो चांगलाच सरावला.

नेल्सन एक अभ्यासू व गुणी मुलगा होता. त्याला खेळ आणि नृत्य या गोष्टींमध्येही रस होता. फोर्ट हेरमध्ये शेवटच्या वर्षात शिकत असताना त्याची निवड विद्यार्थी परिषदेवर झाली. पण 1940 साली कॉलेजच्या प्राचार्यांशी त्याचे काही मतभेद झाले आणि त्याने शिक्षण पूर्ण होण्याआधीच ते कॉलेज सोडले.

म्क्वेकेझविनी शहरात परतल्यावर मात्र नेल्सनला वेगळाच धक्का बसला. त्याचे पालक, सरदार जोगिंताबा डॅलिनडायबो यांनी नेल्सन तसेच त्यांचा स्वतःचा मुलगा, जस्टीस या दोघांचेही संसार थाटून द्यायचे ठरवले. खरंतर, पारंपारिक आफ्रिकी रुढीनुसार, आफ्रिकी कुटुंबच मुलांचे लग्न वगैरे ठरवण्यात पुढाकार घेत असत. पण नेल्सन आणि जस्टीस या दोघांच्याही मनात काही वेगळेच होते. त्यामुळे दोघेही घरातून पळून गेले आणि जोहान्सबर्ग शहरात पोहोचले. नेल्सनला वकील बनायचे होते. सुदैवाने त्याला *लाझर सिडेल्स्की* या सहृदयी गोऱ्या वकिलाकडे नोकरी मिळाली. सिडेल्स्कीच्या कार्यालयात काम शिकता शिकता नेल्सनला आपले शिक्षण सुरू ठेवणे सोपे गेले.






जोहान्सबर्गमध्ये नेल्सनला आणखी काही गोष्टी शिकायला मिळाल्या. गावातून आलेल्या नेल्सनला या महानगरातील जीवन खूप कोंदट, दगदगीचे आणि नीरस असल्याचे जाणवले. सत्तारुढ गोरे कृष्णवर्णीय लोकांना किती वाईट पद्धतीने वागवतात, हे नेल्सनने जोहान्सबर्गमध्येच पाहिले. कृष्णवर्णीय लोकांना काही विशिष्ट भागातच वस्ती करण्याची सक्ती होती. त्यांची घरे खूप लहान आणि गैरसोयीची होती. घरात वीज, पाणी, चूल वगैरे सुविधा नव्हत्या. कृष्णवर्णीय लोक फक्त आफ्रिकी लोकांसाठीच असलेल्या बसमधून प्रवास करू शकत आणि फक्त आफ्रिकी लोकांसाठीच असलेल्या उपहारगृहात खाऊ शकत.

पण सर्वात वाईट गोष्ट होती, पासबुक पद्धत! राहात्या घरापासून दूर असलेल्या दुसऱ्या शहरात नोकरीसाठी जाणाऱ्या कृष्णवर्णीय व्यक्तींना जवळ एक पासबुक बाळगावे लागे. वैध पासबुक नसेल तर त्यांना तुरुंगातही पाठवले जात असे.

दक्षिण आफ्रिकेच्या शासनाने या पद्धतीला *अपारथीड* (वर्णभेद) असे नाव दिले. याचा अर्थ वेगवेगळ्या वर्णाच्या लोकांना वेगवेगळे ठेवायचे. अमेरिकेतही अशीच एक *सेग्रीगेशन* नावाची पद्धत होती. *अपारथीड* पद्धतीत गोरेलोक आणि कृष्णवर्णीय लोक यांना एकत्र राहाणे, खाणे-पिणे, प्रवास करणे, व्यापार करणे, एकाच शाळेत वा चर्चमध्ये जाणे या गोष्टींवर कायदेशीर निर्बंध होते. नेल्सनने ही सारी अन्यायी व्यवस्था पाहिली. ही व्यवस्था आपण बदलायची अशी तीव्र इच्छा हळूहळू त्याच्या मनात रुजत गेली.





अशा प्रतिकूल परिस्थितीतही नेल्सनने जोहान्सबर्गमध्ये बरीच प्रगती केली. त्याच्याकडे एक चांगली नोकरी होती आणि त्याचे शिक्षणही सुरू होते. या दरम्यान त्याची भेट त्याच्या एका मित्राची चुलत बहीण *एवलीन मेस* हिच्याशी झाली. दोघे प्रेमात पडले आणि त्यांनी लग्न केले. त्यांना दोन मुले, *थेम्बेकाइल* आणि *मगॅथो* तसेच एक मुलगी *मकाझीव* ही तीन अपत्ये झाली.

त्या काळात कृष्णवर्णीय लोकांवर होत असलेल्या जुलुमांबाबत रोष व्यक्त करण्यासाठी काही लोक सभा घेत. नेल्सन अशा सभांमध्ये उपस्थित राहू लागला. या लोकांमध्ये कृष्णवर्णीय होते तसेच गोरे लोकही होते. हे लोक *आफ्रिकी राष्ट्रीय काँग्रेस* संघटनेचे सदस्य होते. कृष्णवर्णीयांना गरीबी, उपेक्षित आणि असुरक्षित अवस्थेत ढकलणारे वर्णभेदी कायदे बदलण्याची प्रतिज्ञा ते घेत असत. संघटनेचे काही सदस्य गोऱ्या लोकांना आपले शत्रु समजत. पण नेल्सनचे मत मवाळ होते. गोरे लोक तसेच इतर वंशाचे लोक कृष्णवर्णीयांवर सत्ता न गाजवता, जुलूम न करता दक्षिण आफ्रिकेत राहिले, तर त्यांची हरकत नव्हती.

नेल्सनने वकील बनून आपले स्वप्न पूर्ण केले. 1953 साली आपला सहकारी *ऑलिव्हर ताम्बो* याच्यासोबत मिळून नेल्सनने जोहान्सबर्गमध्ये पहिले कृष्णवर्णीय वकिली कार्यालय थाटले. या कार्यालयात फक्त कृष्णवर्णीय वकील काम करत. दरम्यान, नेल्सनची ओढ राजकारणाकडे वाढत गेली. त्यामुळे त्याचे आणि पत्नी एवलीनचे संबंध बिघडले. एके दिवशी एवलीन त्याला सोडून निघून गेली. घटस्फोट झाल्यावर नेल्सनची ओळख तरूण सुंदर सामाजिक कार्यकर्ती *विनिफ्रेड नॉमझामो मेडिकिझेल* हिच्याशी झाली. लवकरच दोघे प्रेमात पडले आणि त्यांनी लग्न केले. त्यांना *झेनी* आणि *झिंदझी* या दोन मुली झाल्या.




नेल्सनने निषेध मोर्चे, बहिष्कार आणि संप आयोजित करायला सुरुवात केली. तो *लिबरेशन (मुक्ती)* नावाच्या वृत्तपत्रात लेख लिहू लागला, तसेच *फायटींग टॉक (संघर्ष वार्ता)* नावाच्या मासिकाच्या कार्यात सहभागी झाला. या मार्गाने समतेचा हक्क मिळवण्याच्या संघर्षात अधिकाधिक लोक सहभागी होतील, अशी आशा त्याला होती.

दरम्यान, पासबुकबद्दल असलेले नियम अधिकाधिक कठोर होत असल्याचे नेल्सनला दिसू लागले. वैध पासबुक दाखवू शकले नाहीत म्हणून, दरवर्षी लाखो कृष्णवर्णीयांना अटक होऊ लागली व त्यांच्यावर खटले चालवले जाऊ लागले. बऱ्याचदा लोक घराबाहेर उभे राहात किंवा जवळच फिरायला जात. अशा वेळी पासबुक जवळ ठेवण्याची गरज नसे. पण अशा लोकांनाही घरानजिक अटक केली जाऊ लागली.

1960 साली वर्णभेद विरोधी एका नेत्याने निषेध मोर्चा आयोजित केला. आपले पासबुक मुद्दाम घरीच ठेवून या आणि अटक व्हा, असे आवाहन त्याने कृष्णवर्णीयांना केले. जोहान्सबर्गजवळच्या *शार्पविल* या छोट्याशा शहरात 15,000 लोक पासबुक घरी ठेवून पोलीस स्टेशनसमोर जमले. पोलिसांनी या नि:शस्त्र लोकांवर गोळीबार केला. त्यात एकोणसत्तर लोक ठार झाले आणि इतर दोनशे जखमी झाले. या लोकांच्या समर्थनार्थ नेल्सनने आपले स्वत:चे पासबुक जाहिररित्या आगीच्या हवाली केले.









लवकरच, नेल्सन मंडेला या नावाची चर्चा सर्वत्र होऊ लागली. गोऱ्या लोकांना नेल्सनचे भय वाटू लागले. ते नेल्सनवर नाराज झाले. नेल्सनची कृती त्यांना अजिबात पसंत नव्हती. गोरे लोक कृष्णवर्णीयांना कायम आपल्या अंमलाखाली ठेवू इच्छित होते. दक्षिण आफ्रिकेतील स्थिती आहे तशीच चालू राहावी, असे त्यांना वाटत होते.

एके रात्री नेल्सन गाढ झोपेत असताना चार पोलीस बळजबरीने त्याच्या घरी घुसले आणि नेल्सनला पकडून तुरुंगात घेऊन गेले. आपले वर्णभेद विरोधी विचार आणि कृती यांमुळे नेल्सनला अनेकदा तुरुंगात जावे लागले. 1963 साली वर्णभेद विरोधकांनी विद्युत वाहिन्या, संयंत्रे व सरकारी इमारती यांचे नुकसान करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी नेल्सनवर घातपात केल्याचा तसेच गोऱ्या सरकारविरुद्ध हिंसक कारवाया केल्याचा आरोप ठेवण्यात आले. हे आरोप खूप गंभीर होते आणि ते सिद्ध झाले तर नेल्सनला मृत्युदंड होऊ शकत होता. पण नेल्सन आणि इतर अनेक आरोपी दोषी ठरले तरी त्यांना मृत्युदंडाची शिक्षा देण्यात आली नाही. त्याऐवजी, त्याला जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली.





नेल्सनला केपटाउननजिक *रोबेन द्विप* येथील कारागृहात नेण्यात आले. त्याला तेथील एका कोठडीत ठेवण्यात आले. कोठडीला एक लहानशी खिडकी होती. त्यातून तुरुंगाचे आवार दिसत असे. कोठडी तीन पावले चालता येतील एवढीच लांब होती. नेल्सन झोपला की त्याचे पाय समोरच्या भिंतीला तर डोके मागच्या भिंतीला टेकत असे. तुरुंगाची भिंत दोन फूट जाड होती. नेल्सन केवळ सेहेचाळीस वर्षांचा होता. राजकीय कैदी म्हणून पुढील सत्तावीस वर्षे त्याला याच कोठडीत काढायची होती.

नेल्सनला आपली पत्नी विनी आणि मुले यांची खूप आठवण येत असे. या काळात विनीला जोहान्सबर्गबाहेर जाण्यास सरकारने सक्त मनाई केली होती. रात्री तसेच आठवड्याच्या शेवटी विनीला पोलिसांच्या नजरकैदेत ठेवले जात असे. तिला रोबेन द्विपावर जाण्याची इच्छा झाली तर आधी सरकारची परवानगी काढावी लागे. हा प्रवास 950 मैल इतका मोठा होता. त्याचा खर्चही मोठा होता. त्यामुळे सरकारने परवानगी दिली तरी ती नेहमी नेहमी तिथे जाऊ शकत नव्हती. नेल्सनला सहा महिन्यातून एकदा एकाच व्यक्तीला भेटण्याची आणि फक्त एकच पत्र वाचण्याची परवानगी होती.





तुरुंगातील जीवन खूप कठीण होते. नेल्सनला चुन्याच्या खाणीत खाणकाम करावे लागे किंवा दररोज तासनतास खडक फोडून त्यांची माती करावी लागे. खडकांवरून परावर्तित होणाऱ्या सूर्याच्या तीव्र किरणांमुळे त्याच्या डोळ्यांचे बरेच नुकसान झाले. त्याने मागणी केलेले उन्हात वापरण्याचे चष्मे मिळायला तीन वर्षे लागली. रोबेन द्विपावर घड्याळे वापरण्यास परवानगी नव्हती. पहारेकऱ्यांची शिट्टी वाजली किंवा त्यांनी आरोळी ठोकली की वेळेचा अंदाज लावावा लागे.

तुरुंगाधिकाऱ्यांनी आणि पहारेकऱ्यांनी नेल्सनची इच्छाशक्ती कमकुवत करण्याचे खूप प्रयत्न केले, पण त्यांना यश मिळाले नाही. तुरुंगात राहूनही तो दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांच्या स्वातंत्र्याचा विचार मनात ठेवून काम करत राहिला. त्याने कैद्यांना मिळणारे शिळे अन्न, कैद्यांना अपमानित करण्यासाठी पायघोळ पँटऐवजी देण्यात येणाऱ्या छोट्या चड्ड्या तसेच तुरुंगाचे जाचक व अन्याय्य नियम यांचा विरोध केला. यामुळे तो इतर कैद्यांसाठी स्फूर्तीस्थान ठरला. नेल्सन तुरुंगाबाहेर मुक्त असताना एक नेता होता आणि आता तुरुंगातही तो नेताच राहिला.







तुरुंगात असूनही नेल्सनचा प्रभाव देशभर वाढत राहिला. काही मोजकेच लोक त्याला भेटायला येत. त्याचे धैर्य, शहाणपण आणि ठाम निर्धार पाहून ते भारावून जात. हे लोक बाहेरच्या जगात नेल्सनविषयी सांगत. त्यामुळे नेल्सनचे नाव सर्वतोमुखी होऊ लागले. केवळ दक्षिण आफ्रिकेतच नव्हे तर साऱ्या जगभर त्याच्या नावाची चर्चा होऊ लागली. इतर देशांची सरकारे, राजकीय पक्ष, आंतरराष्ट्रीय संस्था आणि सामान्य नागरिक नेल्सनच्या सुटकेची मागणी करू लागले.

नेल्सनला जास्त काळ तुरुंगात ठेवणे आपल्या हिताचे नाही, हे दक्षिण आफ्रिकी सरकारला जाणवू लागले. नेल्सनने आफ्रिका सोडावी, या अटीवर त्याला मुक्त करण्याचा प्रस्ताव त्यांनी अनेकदा त्याच्यापुढे ठेवला. पण प्रत्येक वेळी नेल्सनने हा प्रस्ताव धुडकावला. त्याला स्वतःच्या अटींवर मुक्त व्हायचे होते, अन्यथा तो तुरुंगात राहायला तयार होता.

तोवर दक्षिण आफ्रिकेच्या वर्णभेद नीतीची देशभरात तसेच जगात निर्भत्सना होऊ लागली. दक्षिण आफ्रिकेतील लोक वर्णभेदाविरुद्ध सातत्याने आंदोलने आणि हिंसक उद्रेक करू लागले. इतर देशांनी दक्षिण आफ्रिकेवर आर्थिक निर्बंध लादले आणि त्यांच्याशी व्यापारी संबंध तोडले. सारे जग वर्णभेदनीती मातीत गाडून टाकायच्या तयारीत होती.


अखेरीस, दक्षिण आफ्रिका सरकारपुढे नेल्सनला तुरुंगातून मुक्त करण्यावाचून काही पर्याय उरला नाही. देशाचे नवे अध्यक्ष विल्यम डी क्लर्क यांनी 1990 साली नेल्सन मंडेला यांना विनाअट मुक्त केले.



सत्तावीस वर्षे इतक्या प्रदीर्घ आणि कटू कालावधीनंतर नेल्सन पुन्हा स्वतंत्र झाला. त्या अविस्मरणीय दिवशी त्याने मागे खटल्यादरम्यान काढलेले शब्द पुन्हा उच्चारले, “मी एका लोकशाही आणि मुक्त समाजाची स्वप्ने माझ्या उराशी बाळगून आहे. या समाजात सर्व व्यक्ती एकोप्याने राहातील आणि सर्वांना समान संधी उपलब्ध होतील. उर्वरीत जीवन मला असा आदर्श समाज घडवण्यासाठी जगायचे आहे. प्राणांची बाजी लावून मी असा आदर्श समाज निर्माण करण्याचा प्रयत्न करीन.”

नेल्सन मंडेलाने आपल्या सरकारला आणि लोकांना दाखवून दिले की इतकी वर्षे तुरुंगात राहूनही ते झुकले नाहीत की मोडून पडले नाहीत. आपल्या देशाच्या आणि लोकांच्या भल्यासाठी सातत्याने झटत राहाण्याचे, विशेषतः गोरे आणि कृष्णवर्णीय यांच्यात एकता आणि समानता आणण्याचे, आवाहन त्याने लोकांना केले.







सुटकेनंतर नेल्सन मंडेला आणि दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष डी क्लर्क यांना गोरे व कृष्णवर्णीय यांना समान हक्क बहाल केल्याबद्दल नोबेल शांतता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. 1994 साली देशात प्रथमच मुक्त निवडणुक प्रक्रिया राबवण्यात आली. त्यात दक्षिण आफ्रिकेतील प्रत्येक व्यक्तीला मत देण्याचा हक्क मिळाला. लोकांनी नेल्सन मंडेलाला आपल्या नव्या प्रजासत्ताकाचा अध्यक्ष म्हणून निवडले. नेल्सन मंडेला हे निवडणुकीद्वारे निवडून आलेले पहिले कृष्णवर्णीय नेता होते. यामुळे कृष्णवर्णीय आता आपल्याशी शत्रुत्वाने वागतील, असे भय तेथील बहुतांशी गोऱ्या लोकांना वाटू लागले. पण मंडेला, ना गोऱ्यांना देशाबाहेर घालवू इच्छित होते, ना त्यांनी पूर्वी केलेल्या अत्याचाराचा सूड उगवू इच्छीत होते. उलट कोणत्याही वंशाचे पुरुष, स्त्रिया आणि मुले एकोप्याने आणि शांततेने आपल्या देशात राहातील, असा आदर्श लोकशाही मार्ग मंडेला यांनी अवलंबला.

1999 साली मंडेला अध्यक्षपदावरून मुक्त झाले. मग ते आपल्या बालपणच्या कुनु गावातील घरी गेले. आपल्या भूतकाळाचे स्मरण झाल्यावर त्यांच्या मनात आले, "स्वातंत्र्याकडे नेणाऱ्या एका प्रदीर्घ मार्गावर आपण चाललो." या प्रवासात मोठ्या धैर्याने आणि श्रद्धेने त्यांनी देशातील कृष्णवर्णीय तसेच गोऱ्या लोकांना आपल्यासोबत चालण्याचे आवाहन केले होते.



कालक्रम

18 जुलै 1918	दक्षिण आफ्रिकेतील *म्वेजो गावात जन्म.*
1919-20	*कुनु* गावात स्थलांतर.
1927	थेंबूलँडची राजधानी *म्क्वेकेझविनी* शहरात आगमन.
1934	वयात येताना काही पारंपारिक विधींमध्ये सहभाग.
1938	ॲलिस महानगरपालिकेतील *फोर्ट हेर* कॉलेजमध्ये प्रवेश.
1940	*फोर्ट हेर* कॉलेजमधून बहिष्कृत.
1941	*जोहान्सबर्ग*मध्ये आगमन.
1943	*आफ्रिकी राष्ट्रीय काँग्रेस (ANC)* चे सदस्यत्व.
1944	ANC च्या युवा शाखा स्थापनेत योगदान. *एवलीन मेस*शी लग्न. त्यांना पुढे तीन अपत्ये झाली.
1953	*ऑलिव्हर ताम्बो* याच्यासोबत मिळून जोहान्सबर्गमध्ये पहिले कृष्णवर्णीय वकिली कार्यालय थाटले.
1956	वर्णभेदविरोधी कारवायांमुळे इतर 156 लोकांसोबत अटक.
1957	नेल्सन आणि एवलीन यांचा घटस्फोट.
1958	*विनिफ्रेड नॉमझामो मेडिकिझेल* हिच्याशी लग्न. त्यांना पुढे दोन अपत्ये झाली.
1960	*शार्पविल* शहरातील हत्याकांड.
1963	देशद्रोह आणि घातपात या आरोपांखाली जन्मठेपेची शिक्षा.
1990	तुरुंगातून सुटका.
1991	ANC च्या अध्यक्षपदी आणि राष्ट्रीय कार्यकारिणीवर नियुक्ती.
1993	दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष *डी क्लर्क* यांच्यासोबत नोबेल पुरस्काराने सन्मानित.
1994	दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष म्हणून निवड.
1996	पत्नी विनीशी घटस्फोट.
1999	सार्वजनिक जीवनातून निवृत्ती.

